ePaper

|| वर्ष - 8 । अंक -180 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार , दिनांक 9 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## प्रसिद्ध तिरुपती मंदिरात चेंगराचेंगरी, 4 भाविकांचा मृत्यू, मोठी खळबळ



### आतील पानांत

- पाकिस्तानला ट्रॉफीची हौस भारी
- मार्टिन गप्टिलची क्रिकेटमधून निवृत्ती!
- अमेरिकेतली काही राज्ये विकत घेतो!
- अंतराळात वनस्पती वाढविण्यात यश

### अमित शहा यांची भेट घेण्यासाठी अजित पवार दिल्लीत

# ‘राष्ट्रवादी-शप’ला गळती ?

## शरद पवारांच्या पक्षातील खासदार, आमदार फुटण्याच्या चर्चेने खळबळ

। मुंबई । महाईन्यूज

**शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुसंख्य खासदार व आमदार अजित पवार यांच्या पक्षात जाण्याच्या तयारीत असल्याच्या वृत्ताने बुधवारी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. अजित पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आमच्या पक्षाकडून असे कोणतेही प्रयत्न सुरू नसल्याचे सांगून या प्रकरणापासून आपल्या पक्षाला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यातच बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी दिल्ली गाठल्याने या प्रकरणात पुढे काय होणार याची चर्चा रंगली.**



दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार राजकीय हाणामारी पुन्हा एकदा सुरू झाली असून, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुतांश आमदार व खासदार हे अजित पवार यांच्या पक्षात जाण्याच्या मानसिकतेत असल्याची चर्चा गेले काही दिवस सुरू आहे. अजित पवार यांच्या पक्षातील ज्येष्ठ नेत्याच्या म्हणण्यानुसार, सगळेच आमदार त्यांच्या पक्षात येण्यासाठी उत्सुक असले तरी तीन आमदारांना पक्षात घेण्याबाबत त्यांचे वरिष्ठ नेते तयार नाहीत. तसेच खासदारांपैकीही तीन खासदार सोडून बाकी सगळे येण्यासाठी तयार असून निर्णय पक्षश्रेष्ठींनी घ्यायचा असल्याचे या नेत्याने ‘मटा’ला सांगितले. यावरून बुधवारी दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान संपर्क साधून त्यांना पक्षप्रवेश करण्याची ऑफर दिल्याचा खळबळजनक दावा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदारांनी बुधवारी केला. शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे ‘बाप-लेक’ सोडून सर्वांनी राष्ट्रवादीत या, अशाप्रकारचे आवाहनही करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला.

### मुंडेंना नेमका कोणाचा आशीर्वाद मिळालाय

बुधवारी राष्ट्रवादी (शप) पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी अजित पवार यांच्या पक्षाकडून पक्षबदल करण्याचा आग्रह करण्यात येत असल्याचा दावा केला. सुनील तटकरे यांनी डिसेंबर २०२४च्या हिवाळी अधिवेशनात अशी ऑफर दिल्याचेही सांगितले. शरद पवार आणि सुप्रिया सुळे या बाप-लेकीला सोडून या, अशा शब्दांत ही ऑफर होती, असा दावा राष्ट्रवादी (शप) पक्षाकडून केला जात आहे. हा प्रकार घडल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांना फोन करत पक्षफोडीच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे सुळे यांच्या निकटवर्तीयांनी ‘मटा’शी बोलताना सांगितले. तसेच, स्वतः पटेलदेखील ही बाब समजल्यानंतर व्यथित झाल्याचे या निकटवर्तीयाने सांगितले. मात्र स्वतः सुळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी याबाबत कोणतीही प्रतिक्रिया देऊ इच्छित नाही, असे सांगितले.

---

### फेरीवाल्यांचा एकाच दिवशी 10 ठिकाणी लक्षणीय मोर्चा

## कामगार विश्व: महापालिका क्षेत्रामध्ये पथ विक्रेता कायद्याचे अंमलबजावणी व्हावी

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई व नवी मुंबई परिसर उपनगरातील सर्व महापालिका क्षेत्रामध्ये पथ विक्रेता कायद्याचे अंमलबजावणी व्हावी , कारवाई थांबवावी या मागणीसाठी मुंबई आणि इतर परिसरातील पथ फेरीवाल्यांनी वेगवेगळ्या महापालिका आणि नगरपालिका कार्यालयावर एकाच दिवशी दहा ठिकाणी तीव्र लक्षणीय मोर्चे काढण्यात आले. यावेळी विविध आयुक्त ,अधिकारी, कर्मचारी यांच्याशी निवेदन देऊन चर्चा करण्यात आली.**




नॅशनल हॉकर फेडरेशन, महाराष्ट्र हॉकर फेडरेशन, कामगार एकता युनियन,शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन, महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघ आयटक सह विविध संघटनांनी या मोर्चाचे आयोजन करत यशस्वी केले. यात मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, कोकण विभाग यासह विविध क्षत्रिय कार्यालयावर हे मोर्चे काढण्यात आले. यात पिंपरी चिंचवड शहरातील पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते, महाराष्ट्र हॉकर फेडरेशनच्या सचिव विनिता बाळेकुंद्री, कोषाध्यक्ष अखिलेश गौड, संयोजक राजेश माने, शारदा देसाई ,कामगार नेते प्रफुल्ल म्हात्रे ,निमंत्रक बाळकृष्ण खोपडे, हुस्ना खान,राम गुप्ता, शहनाज सय्यद, प्रकाश आमटे, धोंडीराम बद्रे आदी उपस्थित होते .

### सामूहिक प्रयत्नांची गरज

यावेळी नखाते म्हणाले की महाराष्ट्र राज्यामध्ये या पथविक्रेता कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असून राज्यांमध्ये काही ठिकाणी अंमलबजावणी होत आहे तर काही ठिकाणी कारवाई होत आहे हा दुराभास संपवण्यासाठी राज्य शासनाचे एकच धोरण असणे गरजेचे आहे ते करण्यासाठी आपण शासनाला भाग पाडू आणि मुंबई आणि परिसरातील विक्रेते यांच्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना स्वस्तात स्वस्त दरात वस्तू उपलब्ध होतात त्यांच्यामुळे नागरिकांचा फायदा होत आहे त्यांच्याकडे सरकार व महापालिकेने दुर्लक्ष करता कामा नये ते केल्यास पुढील कालावधीमध्ये खूप मोठे आंदोलन होईल.

# पुणे वर्तुळाकार रस्ता भूमिपूजन लवकरच!

## उद्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत भूमिपुजनाची तारीख निश्चितची शक्यता

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) महत्त्वाकांक्षी अशा पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. उद्या, गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे एमएसआरडीसीच्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहेत.**




या आढावा बैठकीत या दोन्ही प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख मुख्यमंत्र्यांकडून निश्चित केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने १६८ किमीचा पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गाचा विस्तार नांदेडपर्यंत करण्याकरीता जालना-नांदेड असा १८० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारांना कार्यादेशही देण्यात आले आहेत. कार्योदेश देऊन बरेच दिवस झाल्याने या प्रकल्पांचे भूमिपूजन केव्हा होणार आणि कामास सुरुवात केव्हा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असताना आता लवकरच भूमिपूजनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एमएसआरडीसीची एक आढावा बैठक गुरुवारी घेणार आहेत. या आढावा बैठकीत पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड या दोन प्रकल्पाच्या भुमिपूजनाचा निर्णय होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही यासंबंधीचे संकेत दिले आहेत.वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी काही प्रमाणात भूसंपादन शिल्लक होते. ९० टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा होती. त्यामुळे ९० टक्के भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून नव्या वर्षात या दोन्ही प्रकल्पाचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती काही दिवसांपूर्वी एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली होती. आता या भूमिपूजनाची तारीख उद्याच्या बैठकीत निश्चित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पुणे वर्तुळाकार रस्त्यासाठी पश्चिमेकडील बाजूचे ९६ टक्के भूसंपादन झाल्याने भूमिपूजनाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पाचे भूमिपूजन करत पश्चिमेकडील बाजूच्या कामाला सुरुवात केली जाण्याची शक्यता आहे. पूर्वेकडील बाजूचे ८२ टक्के भूसंपादन झाले आहे. हे भूसंपादनही लवकरच पूर्ण केले जाण्याची शक्यता आहे. जालना-नांदेडचेही भूसंपादन झाले आहे. तेव्हा या द्रुतगती महामार्गाच्या भूमिपुजनाचीही तारीख यावेळी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. याविषयी गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाहीपुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गाचा विस्तार नांदेडपर्यंत करण्याकरीता जालना-नांदेड असा १८० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

### 90 टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा

या दोन्ही प्रकल्पाच्या बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारांना कार्यादिशही देण्यात आले आहेत. कार्योदेश देऊन बरेच दिवस झाल्याने या प्रकल्पांचे भूमिपूजन केव्हा होणार आणि कामास सुरुवात केव्हा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असताना आता लवकरच भूमिपूजनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एमएसआरडीसीची एक आढावा बैठक गुरुवारी घेणार आहेत. या आढावा बैठकीत पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड या दोन प्रकल्पाच्या भुमिपूजनाचा निर्णय होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही यासंबंधीचे संकेत दिले आहेत.वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी काही प्रमाणात भूसंपादन शिल्लक होते. ९० टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा होती.

# हलव्याचे दागिने बनविणे प्रशिक्षण वर्गाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## गायत्री सखी मंचतर्फे पुढाकार: रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रयत्न





।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिघी परिसरातील महिलांकरिता मकरसंक्रांत सणानिमित्त हलव्याचे दागिने बनवणे प्रशिक्षण वर्ग गंगोत्री पार्क भोसरी येथे यशस्वीपणे पार पडला. यामध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अनेक महिलांनी या प्रशिक्षण वर्गातून हलव्याचे दागिने बनवण्याचे प्रशिक्षण घेतले.**

भाजपा नेते तथा भोसरी विधानसभेचे आमदार महेश.लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गायत्री सखी मंच संस्थापक अध्यक्षा कविता भोंगाळे - कडू यांच्यावतीने या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वाती शिर्के, कल्पना धाडसे, कविता पंडित, सुनीता पंडित, जया सांगळूतकर, आरती लांडगे उपस्थित होत्या.

### महिलांसाठी विविध उपक्रम....

यावेळी बोलताना गायत्री सखी मंच संस्थापक अध्यक्ष भोंगळे-कडू म्हणाल्या, की गायत्री सखी मंच वतीने महिलांसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्या अंतर्गत खास मकर संक्रांती निमित्त हलव्याचे दागिने बनविणे प्रशिक्षण आपण पूर्ण केले असून त्याद्वारे भविष्यात महिला स्वतःचा स्वयं रोजगार व्यवसाय सुरू करतील आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील असा उदात्त हेतू आहे.

## प्लास्टो 2025 प्रदर्शनाचे उदघाटन

# प्लास्टिक उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध !

### आमदार महेश लांडगे
### उद्योग विश्वः असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ प्लॅस्टिक्सचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : मोशी येथीलप्रदर्शन केंद्राला राज्यातील महत्वाचे तसेच पर्यटनाच्या दृष्टिकोनातून या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांचा दीडशे फुटाचा पुतळा उभारला जाणार आहे.जो 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' असेल असे भाजपा नेते तथा भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे म्हणाले. तसेच प्लास्टिक उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे आश्वासन देखील लांडगे यांनी दिले.**



असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ प्लॅस्टिक्सच्या वतीने (एपीपी) 8 ते 11 जानेवारी या दरम्यान मोशी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्लास्टो २०२५ प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी दिग्दर्शक लेखक प्रवीण तरडे, एनसीएलचे माजी संचालक पद्मश्री डॉ. एस. सिवराम, टोयो मशिनरी ॲण्ड मेटल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तोशियुकी सोटोइके, मिलाक्रॉनचे व्यवस्थापकीय संचालक बिल शुक्ला, अभिनेता रमेश परदेशी, एआयपीएमए गव्हर्निंग काउन्सिलचे अध्यक्ष अरविंद मेहता,लेबटेक डेनमार्क कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक जेस्सी, एलके मशिनरी- हॉंगकॉंगचे विपणन संचालक जॅकी वॉंग,मिलेक्रॉनचे बील शुक्ला, 'असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ प्लॅस्टिक्स'चे अध्यक्ष अनिल नाईक आणि प्लास्टो २०२५ प्रदर्शनाचे अध्यक्ष अजय झोड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पद्मश्री शिवराम म्हणाले की, प्लास्टिक उद्योग हे एक उदयनमुख क्षेत्र बनले आहे. प्लास्टिक हे आपले जीवनमान उंचवण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.भविष्यात पर्यावरण पूरक वाहनांचा काळ असणार आहे. या वाहनामध्ये जास्तीत प्लास्टिकचा वापर होणार आहे, यामुळे आपले जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी प्लास्टिकचा वापर पोषक ठरणार आहे. उद्योजक आणि सरकार यांच्यावर मोठी जबाबदारी असणार आहे.

बील शुक्ला म्हणाले की,प्रत्येक क्षेत्रात प्लास्टिक चा वापर होत आहे. देशाच्या अर्थव्यस्थेत प्लास्टिक उद्योगाचे मोलाचे योगदान आहे. प्रास्ताविक अध्यक्ष अनिल नाईक यांनी तर अजय झोड यांनी स्वागत केले तर आभार समीर कोठारी यांनी मानले.

### या पृथ्वीवर फक्त प्लॅस्टिक टिकते...

अभिनेते तरडे म्हणाले की,"या पृथ्वीवर फक्त प्लास्टिक टिकते",असा डायलॉग मुळशी पॅटर्न मध्ये लिहून प्लास्टिकची जाहिरात केली.दैनंदिन जीवनात प्लास्टिक शिवाय जगू शकत नाही. प्लास्टिक एक जगण्याचा भाग बनला आहे.50% टक्के लोक हे प्लास्टिक उद्योगावर पोट भरत आहे. उद्योजक हा देशाचा कणा आहे. औद्योगिक क्रांती शिवाय जगाला पर्याय नाही.

### 40 हजार उद्योजक भेट देणार

अध्यक्ष अनिल नाईक म्हणाले या प्रदर्शनात देश विदेशातील 230 कंपन्याचे स्टॉल असून चार दिवसात सुमारे 40 हजार उद्योजक भेट देणार आहे.प्रदर्शनाला भेट देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करून मोफत नावनोंदणी करावी लागणार आहे. प्रदर्शनस्थळी क्यूआर कोड उपलब्ध असून बुधवार ते शनिवार स १० ते सायं ६ या वेळेत प्रदर्शन खुले असेल.

---

## मालमत्ता कर थकबाकीदार महापालिकेच्या रडारवर!

### शहरात 1 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आता पिंपरी महापालिकेच्या रडारवर आहेत. अशा थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.**




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून एक लाखाहून जास्त थकबाकी असणाऱ्या सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु करण्यात आली आहे. एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार, करसंकलन विभागाने ७ जानेवारीपर्यंत तब्बल ४१८ मालमत्ता जप्त केल्या असून, त्यांच्याकडे तब्बल ११ कोटी ३७ लाख २३ हजार १९८ रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. मालमत्ता जप्ती कारवाईवेळी १५११ मालमत्तांनी आपल्या थकीत कराचा भरणा करुन, २६ कोटी ९२ लाख ७३ हजार ७४९ इतक्या कराचा भरणा केलेला आहे.

थकबाकीदारांना वारंवार आवाहन करुन देखील कराचा भरणा केला नसेल अशा मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईसाठी कठोर पाऊले उचलावीत असेही आदेश करसंकलन मुख्य कार्यालयाकडून विभागीय कार्यालयास देण्यात आले आहेत. शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, खासगी महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आदी आस्थापनांचा समावेश आहे. या थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून, संबंधित विभागीय कार्यालयास कारवाईसाठी पाठविण्यात आली आहे. याचबरोबर अशा मालमत्तांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाणार आहे.

> शहरातील थकबाकीदारांना वारंवार कर भरण्याचे आवाहन करण्यात आले असून एक लाखाहून जास्त रक्कम थकीत असणाऱ्या मालमत्तांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. शहरातील बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राधान्याने जप्त करण्यात येत असून मालमत्ताधारकांनी आपल्या थकीत कराचा तात्काळ भरणा करुन जप्तीची कारवाई टाळावी.
>
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त.

> पिंपरी-चिंचवड शहरातील मोठमोठी हॉटेल, मॉल, पेट्रोल पंप चित्रपटगृहे, मंगल कार्यालये, औद्योगिक कारखाने, खासगी रुग्णालये आदी आस्थापनांची एक लाखापेक्षा जास्त थकबाकी असल्यास अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना संबंधित विभागीय कार्यालयांना दिल्या असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे. त्यामुळे या आस्थापनांनी आपला मालमत्ता कर भरल्याची खात्री करावी.
>
> **– अविनाश शिंदे,**
> सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.

# ‘भाजपा’ चा अनोखा फंडा, दिल्लीवर फडकणार झेंडा !

**दिल्ली विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या, भारतीय जनता पार्टीने कंबर कसली ! सध्या सत्तेवर असलेल्या आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल हे देखील कच्च्या गुरुचे केले नसल्यामुळे त्यांनी प्रत्येक बाबतीत भाजपच्या डावाला प्रतिडाव टाकण्याचे धोरण सध्या अवलंबले आहे. वाटेल ते करून दिल्ली जिंकायची, हे भाजपाचे धोरण असून गेले दोन-तीन वर्षे त्यांच्याकडून त्या दिशेने फासे टाकले जात आहेत. देशात अनेक राज्यांमध्ये सत्ता असली तरी देशाच्या राजधानीवर वर्चस्व नसणे, ही नामुष्की असल्याचे भाजपाच्या नेत्यांना वाटते, आणि आत्ता यावेळी दिल्ली जिंकण्याच्या दृष्टीने वेगवेगळे फंडे आखले जात आहेत !**



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

दिल्लीतील निवडणुका फेब्रुवारीमध्ये असून ८ फेब्रुवारीला दिल्लीत भाजपाचे सरकार असेल, असा मजकूर असणारे अनेक फलक दिल्लीमध्ये लागले आहेत. अशा मजकुराने सोशल मीडियाही सध्या फुलून गेला आहे. कोणत्याही परिस्थितीत दिल्ली जिंकायची असा घाट भाजपाने घातला असून यावेळी साम-दाम-दंड-भेद या सूत्रीचा वापर करून जिंकण्यासाठी भाजपातर्फे आखणी केली जात आहे.

## दिल्लीत कमळ फुलणारच !

शेजारील राज्यांप्रमाणेच दिल्लीतही यावेळी निश्चितपणे कमळ फुलेल, असा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला. आपला पक्ष आता दिल्लीला सर्वश्रेष्ठ राजधानीचा दर्जा देऊ शकतो, दिल्लीला शिक्षण, संस्कृती, सुरक्षा, आरोग्य अशा योजनांसाठी केंद्र सरकारने ७५ हजार कोटी रुपये दिले याची पंतप्रधानांनीच आठवण करून दिली आहे, हे लक्षात घ्यायला हवे. दिल्ली हे विकासाचे जगातील आदर्श मॉडेल ठरले पाहिजे, हा भाजपा पुढाकार घेणार आहे आणि प्रचार करणार आहे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असेल, तर दिल्लीच्या विकासाला डबल इंजिनचा लाभ मिळू शकतो, हे पारंपारिक ब्रीद वाक्य आणि प्रचाराचा मोठा भाग भाजपाने पुन्हा पुन्हा सांगण्यास सुरुवात केली आहे.

## तीन राजकीय पक्षांची झुंज

यावेळी दिल्ली विधानसभेवर कुणाचा झेंडा फडकणार? आम आदमी पक्षाचा, भाजपाचा की काँग्रेसचा? या प्रश्नाने नागरिक हैराण झाले आहेत. गेल्या वेळी 70 पैकी 67 जागा जिंकून केजरीवाल यांनी भाजपाला धोबीपछाड मारली होती. पण, त्या दिवसापासून भाजपाने केजरीवाल सरकारची चोहोबाजूंनी कोंडी केली असून त्यांना रोज नवनव्या प्रकरणात अडकवण्याचे डाव टाकले आहेत. केजरीवाल सरकार पूर्णपणे बदनाम करण्यात भाजपाला यश आले आहे.

दरम्यानच्या काळात भाजपाच्या जोरदार आरोपांचे खंडन करणे केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला शक्य झालेले नाही, याचा फायदा निश्चितपणे भाजपा उचलणार आहे, हे या निवडणुकीत महत्त्वाचे ठरणार आहे. या निवडणुकीचे वातावरण तापायला खऱ्या अर्थाने सहा महिन्यापूर्वीपासूनच सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी आप, भाजपा व काँग्रेस हे तीनही पक्ष सज्ज झालेत. या तीनही पक्षांनी आपल्या बहुसंख्य उमेदवारांच्या नावाचीही घोषणा केली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने तीनही पक्षात राजकीय आरोप-प्रत्यारोपांना जोर चढला आहे.



## ‘आप’ चा कारभार वाटोळे करणारा

दिल्लीचा विकास केवळ भाजपाच करू शकेल, भारताला जगात तिसरी आर्थिक महासत्ता बनविण्याच्या गौरवशाली यात्रेत दिल्लीकरांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. गेल्या दहा वर्षांतील दिल्लीतील आप सरकारचा कारभार घोटाळे व भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे. हाच भाजपाचा प्रचाराचा प्रमुख मुद्दा आहे. आप सरकार आप-दाहून कमी नाही, अशी खिल्ली पंतप्रधानांनीच उडवली आहे. ‘शीशमहल’ या दिल्लीच्या मुख्यमंत्री निवासस्थानावर सुशोभीकरणासाठी ३३ कोटी खर्च झाले, दिल्लीकरांच्या पैशाची ही उधळपट्टी आहे, असा भाजपाने प्रचाराचा मुद्दा बनवला आहे.

दिल्लीच्या शेजारी असलेल्या राज्यांप्रमाणेच दिल्लीतही आता कमळ फुलेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला. भाजपाच केवळ दिल्लीला सर्वश्रेष्ठ राजधानीचा दर्जा देऊ शकते. दिल्लीला सुरक्षा, आरोग्य व विकास योजनांसाठी केंद्र सरकारने ७५ हजार कोटी रुपये दिले याची पंतप्रधानांनीच आठवण करून दिली आहे. दिल्ली हे शहरी विकासाचे जगातील आदर्श मॉडेल ठरले पाहिजे, हा भाजपाचा प्रयत्न राहील. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असेल तर दिल्लीच्या विकासाला डबल इंजिनचा लाभ मिळू शकतो, असे त्यांनी ठासून सांगितले आहे.

## दिल्लीवर विविध योजनांचा वर्षाव

दिल्ली मेट्रो ही दिल्लीच्या कानाकोपऱ्यांत भाजपानेच पोहोचवली आहे. नमो ट्रेन सेवा, राज मार्ग, फ्लायओव्हर, हे सर्व केंद्रानेच केले आहे. गरिबांसाठी पंतप्रधान निवारा योजना हे तर दिल्लीतील जनतेला वरदान ठरले आहे. रेवड्या वाटपाशिवाय निवडणूक जिंकता येत नाही हे सर्व राजकीय पक्षांना ठाऊक झाले आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा या तिन्ही राज्यांत भाजपाने रेवड्या वाटून सत्ता काबीज केली. यापासून सर्वच राजकीय पक्षांनी त्याचे अनुकरण सुरू केले. आम आदमी पक्षाचे संयोजक व संस्थापक अरविंद केजरीवाल व मुख्यमंत्री आतिशी यांनी दिल्लीतील महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्र व मध्य प्रदेशमधील भाजपा सरकारची लाडकी बहीण योजना ‘आप’ ने अगोदरच चोरली आणि जाहीरही करून मतदारांना आकर्षित केले आहे.

## आयारामांना उमेदवारी

आम आदमी पक्षातून भाजपामध्ये आलेल्या अनेकांना भाजपाने उमेदवारी दिली आहे, हा सुद्धा चर्चेचा विषय आहे. आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल हे नवी दिल्ली मतदारसंघातून, मुख्यमंत्री आतिशी कालकाजीतून, सौरभ भारद्वाज ग्रेटर कैलाशमधून, तर सत्येंद्र जैन शकूर बस्तीमधून निवडणूक लढवत आहेत.

## चौथ्यांदा सत्ता अवघड

आम आदमी पक्षाला आता चौथ्यांदा दिल्लीची सत्ता काबीज करणे यंदा महाकठीण आहे. ‘आप’ ला २०१३ मध्ये पहिल्यांदा सत्ता मिळाली. पण, सरकार दीड वर्षांतच कोसळले. काँग्रेसच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित व त्यांच्या सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करून २०१५ मध्ये ‘आप’ ने दिल्लीवर पुन्हा सत्ता मिळवली. गेली दहा वर्षे सलग दिल्लीत ‘आप’ चे सरकार आहे. आता भाजपाने केजरीवाल यांना भ्रष्टाचाराने बरबटलेला नेता म्हणून खलनायक ठरवले. मद्यविक्री घोटाळ्यावरून अरविंद केजरीवाल, संजय सिंह व मनीष सिसोदिया हे सर्व ‘आप’ चे दिग्गज नेते जेलवारी करून आले आहेत. भ्रष्ट कारभारावरून भाजपाने आपची कोंडी केली आहे. यंदा दिल्ली विधानसभेवर कोणाचा झेंडा फडकणार याची देशभर उत्सुकता आहे, पण, त्यात भारतीय जनता पार्टी बाजी मारणार यात शंका नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हजारो कोटी घेऊन ‘टोरेस’चा पोबारा!

## सव्वा लाख ग्राहकांना गंडा; दोन संस्थापक युक्रेनला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई, ठाणे, कल्याण अशा वेगवेगळ्या भागांमध्ये ‘टोरेस’ नावाने शाखा उघडून ग्राहकांना सोने, चांदी आणि हिऱ्याचे दागिने देणाऱ्या कंपनीनं हळूहळू पैशांत गुंतवणूक स्वीकारायला सुरुवात केली. वर्षभर व्यवसायही केला. पण संधी मिळताच हजारो कोटी घेऊन पोबारा केला. पोलिसांनी या प्रकारात कंपनीच्या तीन वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक केली असली, तरी कंपनीच्या दोन संस्थापकांनी विदेशात पलायन केल्याचा संशय पोलिसांना आहे. हे दोघे युक्रेनचे नागरिक आहेत. हेच दोघे या सगळ्या घोटाळ्याचे मास्टरमाईंड असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. जॉन कार्डर आणि व्हिक्टोरिया कोवलेन्को अशी त्यांची नावं असून या दोघांविरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे.**




‘टोरेस’ शोरूमच्या घोटाळ्याची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. हर्न प्रायव्हेट लिमिटेड ही मूळ कंपनी असलेल्या ‘टोरेस’ने मुंबई, ठाणे, कल्याण आणि आसपासच्या भागातल्या जवळपास सव्वा लाख ग्राहकांना गंडा घातला असून घोटाळ्याचा आकडा किमान एक हजार कोटींच्या घरात असल्याचं बोललं जात आहे. सोमवारी मुंबईसह इतर भागातल्या ‘टोरेस’च्या सर्वच शोरूमसमोर गुंतवणूकदारांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. हळूहळू त्यात भर पडली. चर्चा सुरू झाली आणि नेमका प्रकार सगळ्यांच्या लक्षात येऊ लागला. गुंतवणुकीवर दर आठवड्याला ११ टक्के व्याज परतावा देण्याचं आमिष दाखवून लोकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा केल्यानंतर अचानक कंपनीचे सर्व शोरूम बंद झाले होते. गुंतवणूकदारांना यातून समजायचा तो अर्थ समजला आणि एकच गोंधळ उडाला. पोलीस तक्रार झाली. पोलिसांनी तातडीनं पावलं उचलून कंपनीच्या तीन वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना अटकही केली. पण या सगळ्या घोटाळ्याचे खरे सूत्रधार असणारे कंपनीचे दोन संस्थापक मात्र युक्रेनला पसार झाल्याची माहिती आता समोर येत आहे. कंपनीनं प्रामुख्यानं चार प्रकारच्या योजना आम्हाला सांगितल्या. त्यानुसार पहिली दर आठवड्याला २ टक्के व्याज परताव्यासह सोन्यात गुंतवणूक, ३ टक्के व्याज परताव्यासह चांगीमध्ये गुंतवणूक, ४ टक्के व्याज परताव्यासह मेझेनाईट स्टोनमध्ये गुंतवणूक आणि फक्त मोझेनाईट खड्यांमध्ये गुंतवणूक केल्यास ५ ते ६ टक्के व्याजदर परतावा मिळेल असं सांगण्यात आलं, अशी माहिती शिवडीतील एक गुंतवणूकदार गीता गुप्ता यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिली. गीता गुप्ता यांचं या घोटाळ्यात १५ लाखांचं नुकसान झालं आहे. हळूहळू ‘टोरेस’नं गुंतवणुकीवरील व्याजदर परतावा वाढवायला सुरुवात केली. त्यामुळे अधिकाधिक लोक योजनांमध्ये गुंतवणूक करू लागले. त्यांनी पैशांच्या स्वरूपात गुंतवणूक करण्यास लोकांना उद्युक्त केलं. त्यातून आठवड्याला थेट ११ टक्के व्याजदर परतावा देण्याचं आश्वासन दिलं. त्याशिवाय जर कुठल्या गुंतवणूकदारानं नवीन गुंतवणूकदार कंपनीकडे आणले, तर त्या व्यक्तीला २० टक्के व्याजदर परतावा मिळेल, असं कंपनीनं सांगितल्याचंही गुप्ता यांनी नमूद केलं. गुंतवणूकदारांचा त्यांच्यावर विश्वास बसावा म्हणून कंपनीचे पदाधिकारी सेमिनार्समध्ये दावा करायचे की त्यांना स्वस्तात सोनं मिळत असल्यामुळे त्यातून ३०० टक्के नफा होत आहे. या ३०० टक्क्यांमधूनच आपण हा अविश्वसनीय व्याजदर परतावा देत आहोत. यामुळे गुंतवणूकदारांचा त्यांच्यावर विश्वास बसायचा. त्यातून मोठमोठ्या रकमांची गुंतवणूक ‘टोरेस’मध्ये झाली, अशी माहिती दुसरे एक गुंतवणूकदार सलीम अन्सारी यांनी दिली. सुरुवातीला लोकांनी पैशांमध्ये थोडीफार गुंतवणूक केली. पण त्यांना वेळेत दर आठवड्याला व्याजदर परतावा मिळायला लागल्यानंतर त्यांनी स्वत: तर मोठ्या रकमेची गुंतवणूक केलीच, पण त्याचबरोबर त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार यांनाही गुंतवणूक करायला भाग पाडलं. काही गुंतवणूकदार तर स्वत: आणखी गुंतवणूकदार कंपनीकडे आणण्यासाठी एजंटसारखं काम करू लागले. त्यातून त्यांना अतिरिक्त व्याजदर परतावा मिळू लागला.

### कसा झाला घोटाळा?

पण यातून कंपनीकडे पैसा जमा झाल्यावर या सगळ्यांचे पैसे शेवटी बुडाले, अशा शब्दांत एका पोलीस अधिकाऱ्यानं या घोटाळ्याबाबत सांगितलं आहे. या घोटाळ्यातील आरोपींनी खूप आधीच १ जानेवारी २०२५ ला सर्व शोरूम बंद करायचे आणि पसार व्हायचं असं ठरवलं होतं, अशी माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आली आहे. त्यांच्या नियोजनानुसार त्यांनी दादर पश्चिममधली शाखा वगळता इतर सर्व शाखा बंद केल्या. ही शाखाही सोमवारी बंद करण्याच्या तयारीत ते होते, पण त्यांचा प्लॅन फसला. लोकांनी शोरूमकडे धाव घेतली. शिवाजी नगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ‘टोरेस’चे मुंबई महानगर हद्दीत एकूण सहा आलिशान शोरूम होते. यात दादर, ग्रँट रोड, कांदिवली, मीरा रोड, कल्याण आणि सानपाड्यातील शोरूमचा समावेश आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये हे सर्व शोरूम सुरू करण्यात आले होते. या प्रकरणात फसगत झालेल्या गुंतवणुकदारांनी सुरुवातीपासून काय घडलं याची माहिती दिली आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकदारांना भल्यामोठ्या परताव्यांचं आमिष दाखवून आकर्षित केलं.

---

# दुर्बल महिलेला आई होण्याचा अधिकार नाही का?

## या प्रकरणाची पुढील सुनावणी 13 जानेवारी रोजी निश्चित केली आहे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मानसिकदृष्ट्या दुर्बल महिलेला आई होण्याचा अधिकार नाही का?, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने केला. न्यायमूर्ती आर व्ही घुगे आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठासमोर 27 वर्षीय महिलेच्या वडिलांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी सुरू असताना मुंबई उच्च न्यायालयाने हा प्रश्न केला.**



मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आणि अविवाहित असल्याच्या कारणावरून एका महिलेचा 21 आठवड्यांचा गर्भ वैद्यकीयदृष्ट्या संपुष्टात आणण्याची परवानगी मागण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी सुरु होती. या महिलेची मुंबईतील सरकारी जेजे रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करण्याचे निर्देश खंडपीठाने गेल्या आठवड्यात दिले होते. यानंतर वैद्यकीय मंडळाने बुधवारी यासंदर्भात अहवाल सादर केला. त्या अहवालानुसार, ही महिला मानसिकदृष्ट्या अस्वस्थ किंवा आजारी नाही. परंतु 75 टक्के बुद्ध्यांकासह किरकोळ बौद्धिक विकाराने ग्रस्त असल्याचे यात निष्पन्न झाले. महिलेच्या पालकाने तिला कोणत्याही प्रकारचे मानसिक समुपदेशन किंवा उपचार दिले नाहीत. 2011 पासून तिला फक्त औषधोपचारावर ठेवले. तिच्या गर्भामध्ये कोणतीही विसंगती नाही आणि स्त्री गर्भधारणा सुरू ठेवण्यासाठी वैद्यकीयदृष्ट्या योग्य आहे, असे वैद्यकीय मंडळाच्या अहवालात असे म्हटले आहे.

### व्यक्ती फार हुशार असू शकत नाही


मात्र गर्भाचा गर्भपात केला जाऊ शकतो, असेही अहवालात म्हटले असल्याची माहिती खंडपीठाने दिली.अशा प्रकरणांमध्ये गर्भवती महिलेची संमती सर्वात महत्वाची असते, असे अतिरिक्त सरकारी वकील प्राची ताटके यांनी न्यायालयाला सांगितले. वैद्यकीय मंडळाच्या अहवालात ती महिला मानसिकदृष्ट्या आजारी किंवा आजारी नसल्याचे स्पष्टपणे नमूद केल्याची नोंद खंडपीठाने घेतली. तिची बुद्धिमत्ता सरासरीपेक्षा कमी असल्याचे अहवालात म्हटले आहे. कोणतीही व्यक्ती फार हुशार असू शकत नाही. आपण सर्व माणसे आहोत आणि प्रत्येकाची बुद्धिमत्ता वेगळी असते, असे न्यायालयाने सुनावणीदरम्यान म्हटले.

# अंतराळात वनस्पती वाढविण्यात इस्रोला यश!

## मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये वालाचे बियाणे जंतुनाशक करण्यात यश

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या अंतराळ संशोधन संस्थेने आणखी एक नेत्रदीपक कामगिरी करत आपली क्षमता सिद्ध केली आहे. एका विशेष प्रयोगांतर्गत अंतराळात वनस्पती वाढविण्यात ISRO ला यश आले आहे. हा प्रयोग कसा झाला आणि अंतराळात वनस्पती वाढवण्याची गरज का भासते? भारताच्या अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) पुन्हा एकदा इतिहास रचण्यात यश मिळवले आहे. यावेळी अंतराळात वनस्पती वाढवण्याचा विषय आहे. ISRO ने आपल्या PSLV C-60 च्या पीओएम-4 मोहिमेद्वारे मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये वालाचे (घेवडा) बियाणे जंतुनाशक करण्यात यश मिळवले आहे.**



पीओएम-4 मोहिमेत एकूण 24 प्रगत पेलोड होते. कॉम्पॅक्ट रिसर्च मॉड्यूल फॉर ऑर्बिटल प्लांट स्टडीज (क्रॉप्स) द्वारे ही महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य करण्यात आली. ISRO च्या विक्रम साराभाई अंतराळ केंद्राने याची निर्मिती केली होती. या संशोधनादरम्यान आठ वालाचे (घेवडा ) बियाणे बंद पेटीत ठेवण्यात आले होते, जिथे तापमान आणि इतर परिस्थितीकडे विशेष लक्ष देण्यात आले होते. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात वनस्पती कशा उगवतात आणि वाढतात हे समजून घेण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला.हा प्रयोग करण्यासाठी अद्ययावत मॉनिटरिंग तंत्रज्ञानाची उपकरणे बसविण्यात आली होती. उदाहरणार्थ, चांगल्या प्रतीचे कॅमेरे, ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साईड मोजणारे सेन्सर, आर्द्रता शोधक, तापमान मॉनिटर आणि जमिनीतील ओलावा शोधण्याची उपकरणे यांचा समावेश करण्यात आला आहे. या सगळ्यातून सातत्याने प्लांटचा मागोवा घेण्यात आला. चार दिवसांत घेवड्याचे बियाणे यशस्वीरीत्या उगवले असून लवकरच त्यांना पाने येण्याची शक्यता आहे. अंतराळात वनस्पती वाढवण्यामागचा मुख्य हेतू दीर्घकाळ टिकणाऱ्या अंतराळ मोहिमांसाठी अन्न, ऑक्सिजन आणि मानसिक आरोग्यावर उपाय शोधणे हा आहे. जेव्हा अंतराळवीर काही महिने किंवा वर्षे अंतराळात राहतात तेव्हा त्यांना ताज्या अन्नाची कमतरता भासू शकते. अशा वेळी रोपांची लागवड हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकतो. याशिवाय वनस्पती कार्बन डायऑक्साईडचे ऑक्सिजनमध्ये रूपांतर करतात. यामुळे अंतराळयानातील हवेची गुणवत्ता सुधारेल. भविष्यात मंगळ आणि चंद्रासारख्या ग्रहांवर स्थायिक होण्याचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेनेही हा प्रयोग एक मोठे पाऊल आहे. अंतराळात स्वयंपूर्ण मानवी वस्ती प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेल्या अंतराळ शेतीच्या विकासाला वनस्पतींच्या वाढीमुळे नवी दिशा मिळाली आहे.सुरुवातीचे परिणाम उत्साहवर्धक असले तरी तंत्रज्ञान पूर्णपणे विकसित होण्यास वेळ लागेल. अवकाशात वनस्पतींची वाढ संथ गतीने होते आणि अनेकवेळा त्यांना योग्य पोषण मिळत नाही. असे असले तरी इस्रोचे हे पाऊल अंतराळात मानवी वसाहती वसवण्याच्या दिशेने मोठा बदल ठरू शकते. पीओएम-4 मोहिमेत एकूण 24 प्रगत पेलोड होते. कॉम्पॅक्ट रिसर्च मॉड्यूल फॉर ऑर्बिटल प्लांट स्टडीज (क्रॉप्स) द्वारे ही महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य करण्यात आली. ISRO च्या विक्रम साराभाई अंतराळ केंद्राने याची निर्मिती केली होती. या संशोधनादरम्यान आठ वालाचे (घेवडा ) बियाणे बंद पेटीत ठेवण्यात आले होते, जिथे तापमान आणि इतर परिस्थितीकडे विशेष लक्ष देण्यात आले होते. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात वनस्पती कशा उगवतात आणि वाढतात हे समजून घेण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला.हा प्रयोग करण्यासाठी अद्ययावत मॉनिटरिंग तंत्रज्ञानाची उपकरणे बसविण्यात आली होती.

### रोपाची लागवड कशी झाली?

उदाहरणार्थ, चांगल्या प्रतीचे कॅमेरे, ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साईड मोजणारे सेन्सर, आर्द्रता शोधक, तापमान मॉनिटर आणि जमिनीतील ओलावा शोधण्याची उपकरणे यांचा समावेश करण्यात आला आहे. या सगळ्यातून सातत्याने प्लांटचा मागोवा घेण्यात आला. चार दिवसांत घेवड्याचे बियाणे यशस्वीरीत्या उगवले असून लवकरच त्यांना पाने येण्याची शक्यता आहे. अंतराळात वनस्पती वाढवण्यामागचा मुख्य हेतू दीर्घकाळ टिकणाऱ्या अंतराळ मोहिमांसाठी अन्न, ऑक्सिजन आणि मानसिक आरोग्यावर उपाय शोधणे हा आहे. जेव्हा अंतराळवीर काही महिने किंवा वर्षे अंतराळात राहतात तेव्हा त्यांना ताज्या अन्नाची कमतरता भासू शकते. अशा वेळी रोपांची लागवड हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकतो. याशिवाय वनस्पती कार्बन डायऑक्साईडचे ऑक्सिजनमध्ये रूपांतर करतात. यामुळे अंतराळयानातील हवेची गुणवत्ता सुधारेल. अंतराळात स्वयंपूर्ण मानवी वस्ती प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असलेल्या अंतराळ शेतीच्या विकासाला वनस्पतींच्या वाढीमुळे नवी दिशा मिळाली आहे.

# आम्हीच अमेरिकेतली काही राज्ये विकत घेतो!

## ट्रम्प यांनी कॅनडाबाबत आक्रमक भूमिका घेतल्याचे स्पष्ट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाबाबत आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाला अमेरिकेचे ५१वे राज्य बनवण्याबद्दल केलेल्या विधानानंतर आता कॅनडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याला प्रत्युत्तर दिले आहे. कॅनडातील या अधिकाऱ्याने ट्रम्प यांना उलट दोन अमेरिकन स्टेट विकत घेण्याची ऑफर दिली आहे.**



गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प यांच्याकडून कॅनडावर टीका केली जात आहे. तसेच ट्रम्प यांनी कॅनडाला युनायटेड स्टेट्समधील ५१ वे राज्य बनवण्यासाठी आर्थिक शक्ती वापरण्याची धमकी देखील दिली आहे. यादरम्यान सोमवारी ओंटारियो प्रेमियर डग फोर्ड (ONTARIO PREMIER DOUG FORD) यांनी ट्रम्प यांच्या या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. सोमवारी माध्यमांशी बोलताना फोर्ड यांना ट्रम्प यांनी कॅनडाचे विलीनीकरणाबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल विचारणा करण्यात आली. यावर फोर्ड म्हणाले की, “अध्यक्षांना, मी एक काउंटर ऑफर करीन. जर आम्ही अलास्का विकत घेतलं तर कसं राहिल? आणि आम्ही यामध्ये मिनेसोटा आणि मिनियापोलिसचाही समावेश करू?”.ते पुढे बोलताना म्हणाले की, “तुम्हाला माहिती आहे की हे वास्तवाला धरून नाही. मला माहिती आहे की अशी वक्तव्य करणे आणि विनोद करणे त्यांना आवडे, मी हे गांभीर्याने घेतो. ते कदाचित विनोद करत असतील, पण माझ्या निगराणीखाली हे होणे कधीही शक्य नाही”, असेही फोर्ड म्हणाले.कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी तेथील सत्तारूढ पक्षाच्या प्रमुखपदाचा आणि पर्यायाने पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

### डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

आहे. गेले काही महिने ट्रुडोंना पक्षातूनच प्रखर विरोध होत होता. दरम्यान ट्रुडो यांनी राजीनामा देणार असल्याचे जाहीर केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशल पोस्ट करत कॅनडाच्या विलनीकरणबाबत वक्तव्य केलं होतं.डोनाल्ड ट्रम्प ट्रुथ सोशलवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले होते की, “कॅनडातील बऱ्याच लोकांना ५१वे राज्य बनायला आवडेल. कॅनडाला बुडण्यापासून वाचवण्यासाठी आवश्यक मोठ्या प्रमाणातील व्यापारी तूट आणि अनुदाने यापुढे युनायटेड स्टेट्स सहन करू शकत नाही.

# आमिर खान व इंद्र कुमार यांच्यात झालेले मतभेद



आमिर खान(AAMIR KHAN) व माधुरी दीक्षित(MADHURI DIXIT) यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'दिल' हा चित्रपट १९९० साली प्रदर्शित झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्याचे पाहायला मिळाले होते. दिल या चित्रपटाचे दिग्दर्शन इंद्र कुमार यांनी केले होते. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी आमिर खानबरोबर काम करण्याबाबतची आठवण सांगितली. त्याबरोबरच आमिर खानने कयामत से कयामत तक या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. त्याचा हा चित्रपट लोकप्रिय ठरला होता. मात्र, त्यानंतर या अभिनेत्याचे सलग आठ चित्रपट फ्लॉप ठरले. मात्र, दिल या चित्रपटातून त्याला जे यश मिळाले, त्यानंतर आमिर खानने मागे वळून पाहिले नाही, अशीही आठवण इंद्र कुमार यांनी सांगितली आहे. त्याबरोबरच दिल या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आमिर खान व इंद्र कुमार यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले होते, असेही वक्तव्य दिग्दर्शकाने केले आहे.इंद्र कुमार यांनीएका मुलाखतीत म्हटले, "चित्रपटात असा एक सीन होता, जिथे तो काठी तोडतो आणि त्यानंतर तो लग्न करतो. आमिर खानला तो सीन मान्य नव्हता. तो मला म्हणाला की, इंदू तू वेडा झाला आहेस. स्टूल तोडून कोण लग्न करतं? त्यावेळी आमच्यात मतभेद निर्माण झाले होते. आम्ही सकाळी ९ पासून १ वाजेपर्यंत त्या सीनवर चर्चा करीत होतो. मी आमिरला समजावून सांगितले की, या सीनला लोक टाळ्या वाजवतील आणि माझे म्हणणे खरे ठरले.", अशी आठवण सांगत इंद्र कुमार यांनी म्हटले की, आमिर खानने हा किस्सा अनेक मुलाखतींत सांगितला आहे.

# लग्नानंतर परिणीतीचा अभिनयाला अलविदा?



परिणीती चोप्राने सप्टेंबर महिन्यात राजकीय नेते राघव चड्ढा यांच्याशी लग्नगाठ बांधली. लग्नानंतर तिचा मिशन रानीगंज हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला, पण या चित्रपटाने फार चांगली कमाई केली नाही. सध्या ती तिच्या 'चमकीला' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. याचदरम्यान, परिणीती चोप्राने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट तिच्या कामाबद्दल आहे. लग्नानंतर परिणीती पतीप्रमाणे राजकारण जाईल, अशा चर्चाही होत्या. तिला याबाबत विचारण्यात आलं होतं, ज्यावर तिने आपल्याला राजकारणात रस नसल्याचं म्हटलं होतं. पण आता तिने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर करत करिअरबद्दल महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. परिणीती संगीत क्षेत्रात करिअरची सुरुवात करणार आहे.परिणीती चोप्रा तिच्या नव्या प्रवासाबद्दल खूप उत्सुक आहे. ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर करताना अभिनेत्रीने एक लांबलचक कॅप्शनही लिहिलं आहे. "संगीत हे माझ्यासाठी नेहमीच हॅप्पी प्लेस राहिलंय. मी अनेक संगीतकारांना अनेक वर्षांपासून स्टेजवर परफॉर्म करताना पाहत आले आहे. आता मीही या जगाचा एक भाग होणार आहे. मी स्वतःला खूप नशीबवान समजते. माझ्या आयुष्यातील एक नवीन अध्याय सुरू करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे," असं परिणीतीने लिहिलं आहे.परिणीतीच्या या पोस्टवर चाहते आणि बॉलीवूडमधील तिचे मित्र-मैत्रिणी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. तिच्या या नव्या प्रवासासाठी चाहते तिला खूप शुभेच्छा देत आहेत.

# तृप्ती आता 'आशिकी ३'मध्ये काम करणार नाही

'बिग बॉस १७' हा शो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शोच्या ग्रँड फिनालेला अवघे चार दिवस बाकी आहेत. अंकिता लोखंडेचा पती या शोच्या फिनालेमध्ये पोहोचू शकला नाही. मुनव्वर फारुकी, मनारा चोप्रा, अभिषेक कुमार, अरुण महाशेट्टी व अंकिता लोखंडे हे टॉप पाच स्पर्धक फिनालेमध्ये पोहोचले आहेत. मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर तिची बहीण व बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राने तिच्यासाठी पोस्ट शेअर केली आहे. प्रियांका चोप्रा ही मनारा चोप्राची मामेबहीण आहे. मनारा या शोमध्ये सहभागी झाल्यानंतरही प्रियांकाने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत मनाराला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर प्रियांकाने तिचा एक फोटो पोस्ट करत तिचं अभिनंदन केलं आणि तिच्यासाठी मेसेज पाठवला आहे.प्रियांका चोप्राने मनाराचा बिग बॉसमधील एक फोटो स्टोरीला शेअर केला. "आपलं बेस्ट दे आणि बाकी सगळं विसरून जा," असं कॅप्शन दिलं आहे. तिने मनारा चोप्राला टॅग करत रेड हार्ट इमोजीही पोस्ट केला आहे. यासोबत प्रियांकाने मिताली आणि तिच्या आईलाही टॅग केलं आहे.काही दिवसांपूर्वी प्रियांका चोप्राची आई मधु चोप्रा यांनीही 'बिग बॉस १७' मधील स्पर्धक मनारासाठी एक व्हिडीओ शेअर केला होता.



# बोनी कपूर यांचा मजेशीर अंदाज

आमिर खानचा मुलगा जुनैद खान आणि बोनी कपूर-श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूर लवकरच 'लव्हयाप्पा' या चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. या चित्रपटाच्या भव्य प्रदर्शनाआधी, दोन्ही स्टार किड्स आपापल्या अनोख्या पद्धतीने त्याचा प्रचार करत आहेत. यामध्ये खुशीने तिची बहिण जान्हवी कपूर आणि वडील बोनी कपूर यांच्याबरोबर मजेशीर रील तयार करत चित्रपटाचे प्रमोशन केले आहे.'लव्हयाप्पा हो गया' असे या गाण्याचे नाव आहे. खुशीने तिच्या इन्स्टाग्रामवर एक मजेशीर रील शेअर केली, ज्यामध्ये ती आणि जान्हवी या गाण्याचे हुक स्टेप्स करताना दिसत आहेत.

# एका मुलीच्या तोंडावर गरम दूध फेकलं

बॉलीवूडचा ९० च्या दशकातील सुपरस्टार अभिनेता गोविंदाने वैयक्तिक आयुष्यात १९८७ मध्ये सुनीता आहुजाशी लग्नगाठ बांधली. अभिनेत्याचं पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने लगेच लग्नबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला होता. गोविंदा आणि सुनीता यांची ओळख कुटुंबीयांमुळे झाली होती. त्यावेळी गोविंदा सिनेविश्वात सक्रिय झाला नव्हता.अभिनेत्याची पत्नी सुनीताने जुन्या एका मुलाखतीत



त्यांच्या भेटीबद्दल खुलासा केला आहे. सुनीताच्या बहिणीच्या नवऱ्याने गोविंदाबद्दल पहिल्यांदा तिला सांगितलं होतं आणि त्यावेळी तो कोणत्याच महिलांशी बोलत नाही असं सुनीताला वाटलं होतं. इतकंच काय, तर गोविंदा कॉलेजमध्ये शिक्षण घेताना दोन मुलींबरोबर हिंसकपणे वागलाय असंही तिच्या कानावर आलं होतं.

# मार्टिन गप्टिलची क्रिकेटमधून निवृत्ती!

## गप्टिल न्यूझीलंडकडून तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंडचा अनुभवी फलंदाज मार्टिन गप्टिलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची अधिकृत घोषणा केली आहे. २००९ मध्ये आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला सुरुवात करणारा मार्टिन गप्टिल गेल्या दोन वर्षांपासून न्यूझीलंड संघाचा भाग नव्हता. मार्टिन गप्टिल न्यूझीलंडकडून तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला आहे. यासह त्याची १४ वर्षांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द संपुष्टात आली आहे. यादरम्यान त्याने न्यूझीलंड संघासाठी अनेक मोठे विक्रम केले. मात्र तरीही तो टी-२० लीग क्रिकेटमध्ये खेळत राहणार आहे.**



मार्टिन गप्टिल हा न्यूझीलंडसाठी टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. याशिवाय एकदिवसीय विश्वचषकात द्विशतक झळकावण्याचा पराक्रमही त्याने केला आहे. २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषकादरम्यान त्याने हे द्विशतक झळकावले होते. निवृत्तीची घोषणा करताना मार्टिन गप्टिल म्हणाला, 'लहानपणी न्यूझीलंडसाठी खेळणं हे माझे नेहमीच स्वप्न होतं आणि मी माझ्या देशासाठी ३६७ सामने खेळलो याचा मला अभिमान वाटतो.'पुढे गप्टिल म्हणाला, मी राष्ट्रीय क्रिकेट संघाकडून क्रिकेट खेळताना महान क्रिकेटपटूंच्या समुहाबरोबर संघाची जर्सी घालून खेळतानाच्या आठवणी मी नेहमी जपत राहीन. मी माझे सर्व सहकारी आणि प्रशिक्षक कर्मचाऱ्यांचे, विशेषत: मार्क ओ'डोनेल यांचे खूप आभार मानू इच्छितो. ज्यांनी मला १९ वर्षांखालील स्तरापासून प्रशिक्षण दिले आहे आणि माझ्या संपूर्ण कारकिर्दीत सतत पाठिंबा देत कायम शिकवण देत राहिले. माझे मॅनेजर लीन मॅकगोल्डरिक यांचेही विशेष आभार, पडद्यामागील सर्व काम कधीच दुर्लक्षित झाली नाहीत आणि तुमच्या पाठिंब्यासाठी मी नेहमीच ऋणी राहीन. गप्टिलने चाहत्यांचेही आभार मानले.मार्टिन गप्टिलने २००९ मध्ये न्यूझीलंडकडून एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि पदार्पणातच शतक झळकावले. त्याच्या पहिल्याच सामन्यात त्याने दाखवून दिले होते की तो एक जबरदस्त खेळाडू आहे.

२००९ मध्येच त्याने कसोटी आणि टी-२० मध्ये पदार्पण केले. आपल्या दमदार फलंदाजीच्या जोरावर त्याने किवी संघात आपले कायमचे स्थान निर्माण केले. यानंतर २०१५ च्या वनडे वर्ल्ड कपमध्ये त्याने द्विशतक झळकावले. त्याच्या नावावर ४७ कसोटी सामन्यांमध्ये २५८६ धावा, १९८ एकदिवसीय सामन्यांमध्ये ७३४६ धावा आणि १२२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३५३१ धावा आहेत. तिन्ही फॉरमॅटमध्ये त्याच्या नावावर एकूण २३ शतकं आहेत.२०१९ च्या वर्ल्डकपचा उपांत्य फेरीचा सामना भारतीय चाहत्यांसाठी एक कटू आठवण ठरला. ओल्ड ट्रॅफर्डच्या क्रिकेट मैदानावर न्यूझीलंड वि भारत यांच्यात हा सामना खेळवला गेला. किवी संघाने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत आठ गडी गमावून २३९ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सुरुवात नक्कीच खराब झाली. पण खालच्या फळीत धोनी (५०) आणि जडेजा (७०) यांनी चांगली फलंदाजी करत सामन्याचा रोख बदलला. पण गप्टिलच्या अचूक थ्रोमुळे टीम इंडियाच्या हातून विजय हिसकावला. त्याने सर्वात मोठा फिनिशर धोनीला धावबाद करून पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यानंतर हा सामनाही टीम इंडियाच्या हातातून गेला. मार्टिन गप्टिल हा न्यूझीलंडसाठी टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. याशिवाय एकदिवसीय विश्वचषकात द्विशतक झळकावण्याचा पराक्रमही त्याने केला आहे.

### पदार्पणातच शतक झळकावले

निवृत्तीची घोषणा करताना मार्टिन गप्टिल म्हणाला, 'लहानपणी न्यूझीलंडसाठी खेळणं हे माझे नेहमीच स्वप्न होतं आणि मी माझ्या देशासाठी ३६७ सामने खेळलो याचा मला अभिमान वाटतो.'पुढे गप्टिल म्हणाला, मी राष्ट्रीय क्रिकेट संघाकडून क्रिकेट खेळताना महान क्रिकेटपटूंच्या समुहाबरोबर संघाची जर्सी घालून खेळतानाच्या आठवणी मी नेहमी जपत राहीन. मी माझे सर्व सहकारी आणि प्रशिक्षक कर्मचाऱ्यांचे, विशेषत: मार्क ओ'डोनेल यांचे खूप आभार मानू इच्छितो. ज्यांनी मला १९ वर्षांखालील स्तरापासून प्रशिक्षण दिले आहे आणि माझ्या संपूर्ण कारकिर्दीत सतत पाठिंबा देत कायम शिकवण देत राहिले. माझे मॅनेजर लीन मॅकगोल्डरिक यांचेही विशेष आभार, पडद्यामागील सर्व काम कधीच दुर्लक्षित झाली नाहीत आणि तुमच्या पाठिंब्यासाठी मी नेहमीच ऋणी राहीन. गप्टिलने चाहत्यांचेही आभार मानले.मार्टिन गप्टिलने २००९ मध्ये न्यूझीलंडकडून एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि पदार्पणातच शतक झळकावले.

# पाकिस्तानला चॅम्पियन्स ट्रॉफीची हौस भारी

## स्टेडियम्स तयारच नाही, यजमानपद दुबईकडे जाण्याची शक्यता

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ येत्या फेब्रुवारीमध्ये खेळवला जाणार आहे. पाकिस्तानकडे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे यजमानपद आहे. पाकिस्तानमध्ये कराची, लाहोर आणि रावळपिंडी या तिन्ही ठिकाणी हे सामने खेळवले जाणार आहेत. पण सध्याच्या घडीला पाकिस्तानातील हे स्टेडियम अजून तयार झाले नसल्याचे समोर आले आहे. महिन्याभरात सुरू होणाऱ्या स्पर्धेसाठी पाकिस्तान पूर्ण तयारीत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहेत.**





आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी सुरू होण्यास एक महिना उरला आहे, परंतु पाकिस्तानमध्ये स्टेडियममधील स्थिती चिंताजनक आहे. कराचीतील नॅशनल स्टेडियम, लाहोरमधील गद्दाफी स्टेडियम आणि रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम येथे बांधकाम आणि अपग्रेडेशनचे काम अजूनही सुरू आहे आणि ही तिन्ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे सोपवण्याची वेळ आली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये सुरू झालेले स्टेडियमचे काम ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार होते, परंतु ते पूर्ण होण्याच्या जवळपासही नाही.आयसीसी हे चित्र पाहून चिंतेत आहे. ज्याप्रमाणे गेल्या वर्षी यूएसएमध्ये होत असलेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान गोंधळाची स्थिती होती. त्याचप्रमाणे चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वीची पाकिस्तानातील स्थिती ही अगदी तशीच आहे. तिन्ही स्टेडियम अद्याप पूर्ण झालेली नाहीत आणि हे नूतनीकरण नाही तर स्टेडियमचं मूळ बांधकाम चालू आहे. आसनाच्या जागा, फ्लडलाइट्स, सुविधा आणि अगदी आऊटफिल्ड आणि खेळपट्टी सह खूप काम बाकी आहे.”

### स्टेडियममध्ये अद्याप बांधकाम सुरू

आता चॅम्पियन्स ट्रॉफी सुरू होण्यास अवघे ४० दिवस उरले असून पाकिस्तानच्या तिन्ही स्टेडियममध्ये अद्याप बांधकाम सुरू आहे. पुढील आठवड्यात आयसीसीचे अधिकारी पाकिस्तानात जाऊन कराची, रावळपिंडी आणि लाहोरच्या स्टेडियमची पाहणी करतील, असे वृत्त आहे. दिलेल्या वेळेत स्टेडियम तयार करण्यासाठी पीसीबीला मुदत देण्यात आली आहे. जर पीसीबीने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण केले नाही आणि आयसीसीच्या चेकलिस्टनुसार ठिकाणे तयार झाली नाहीत, तर संपूर्ण स्पर्धा पाकिस्तानमधून दुसऱ्या ठिकाणी आयोजित केली जाऊ शकते.